SPECIAL ISSUE - SEPT. 2013

ISSN - [illegible]

# SHODHANKAN

MULA EDUCATION SOCIETY'S

## ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE

Sonai, Tal. Newasa, Dist. Ahmednagar

Sponsored and University Recognized

## NATIONAL HISTORY CONFERENCE

## Society, Arts and Culture During The Period Of Satvahana

27-28 September 2013

25 रौप्य महोत्सव



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका



| अ.नं. | विषयाचे नांव | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | सातवाहन काळातील सांस्कृतिक विकास : विशेष विशेष संदर्भ नाशिक पांडवलेणी, अजिंठा व पैठण | प्रा. अनिल बापुराव मते | १ |
| २ | सातवाहन कालीन स्त्रिजीवन | प्रा.डॉ.करपे आर.एन चोरमले अशोक कोंडीराम | ४ |
| ३ | सातवाहन कालीन धार्मिक जीवन | प्रा.सौ.मिनाक्षी सुधाकर देवरे | ८ |
| ४ | हाल सातवाहनाच्या गाथासप्तशतीतील आहार व मद्यपानाचा अभ्यास | डॉ. एम.बी.वाघमारे | ११ |
| ५ | सातवाहनकालीन नाणी | प्रा.शेख जे.व्ही. | |
| ६ | सातवाहनांच्या इतिहासांची साधने | प्रा.डॉ.भारती नवथर | |
| ७ | सातवाहनकालीन, कला, संस्कृती व सामाजिक जीवन | प्रा.ढोले अशोक एकनाथ | २७ |
| ८ | सातवाहनकालीन नाशिकमधील आर्थिक जीवन | प्रा.सौ.सुशिला भदाणे | ३२ |
| ९ | सातवाहनकालीन जुन्नर | लहु कचरू गायकवाड | ३५ |
| १० | सातवाहनकालीन लोकजीवन | प्रा.काशीद एम.ए. | ४३ |
| ११ | सातवाहनकलीन सामाजिक जीवन | प्रा. काकडे एल.बी. | ४६ |
| १२ | सातवाहन काळातील स्त्रियांचे लोकोपयोगी कार्य | डॉ.वासुदेव म.डोंगरदिवे | ५० |
| १३ | सातवाहनकालीन लेणी | प्रा.डॉ.किरण प्रकाश काळे प्रा.विधाते एन.एन. | ५६ |
| १४ | सातवाहन काळातील सामाजिक जीवन | प्रा. अशोक धो.बिडगर | ५८ |
| १५ | सातवाहन काळातील आर्थिक व्यवहार | प्रा. आर.एन.पवार | ६१ |
| १६ | सातवाहन सम्राट हाल याच्या गाथासप्तशती या ग्रंथातून व्यक्त होणारी नैतिक मुल्ये | प्रा.किरण ग.कुंभार | ६५ |
| १७ | सातवाहन कालीन स्त्रियांची स्थिती एक चिंतन | प्रा.सुप्रिया संग्राम पवार | ६७ |
| १८ | सातवाहनाचे कृषी विषयक धोरण | डॉ.राऊत उद्धव उमाजी | ६९ |
| १९ | सातवाहन काळातील सामाजिक जीवन | डॉ.राजेंद्र नामदेव रासकर | ७१ |
| २० | सातवाहन कालीन प्रादेशिक प्रशासनाचे स्वरूप | प्रा.के.एल.गिरमकर | ७४ |
| २१ | सातवाहनकालीन बौद्ध लेणी : स्थापत्यकलेचा उत्कट अविष्कार | प्रा.सर्जेराव बनसोडे, विजय पांडे | ७७ |
| २२ | मातृसत्ताक पद्धती व सातवाहनकालीन स्त्रीजीवन | राजेभाऊ साहेबराव इंझे | ८० |
| २३ | सातवाहनकालीन मराठवाड्यातील प्रमुख बाजारपेठा | डॉ.प्रभाकर मिरकड | ८४ |
| २४ | सातवाहनकालीन व्यापार व उद्योग एक अवलोकन | डॉ.के.एम.अंबाडे | ८७ |
| २५ | सातवाहनकालीन महाराष्ट्राचे काही ऐतिहासीक पैलु | प्रा.प्रगती मारकवार | ८९ |
| २६ | सातवाहनकालीन सामाजिक व आर्थिक परिस्थिती विशेष संदर्भ नासिक | डॉ.आर.पी.भामरे | ९२ |
| २७ | सातवाहनकालीन स्त्रियांची स्थिती | प्रा.उपलंचवार श्रीकांत शंकर | ९६ |
| २८ | सातवाहन कालीन स्त्रीजीवन (इ.स.पु.२३५ ते इ.स.२२५) | प्रा.डॉ.सौ.अरूणा मोरे | १०० |
| २९ | सातवाहनकालीन सामाजिक जीवन | डॉ.मीना चंद्रभान साळे | १०६ |
| ३० | सातवाहनकालीन स्त्री जीवन | कु.शिंदे जयश्री | १०८ |
| ३१ | Trade and Commerce Of Satavahana Period | Sonawane Digambar J. | १११ |
| ३२ | Study of Caves- Satvahan Period | Dr. Amol Shankarrao Vidyasager | ११३ |
| ३३ | सातवाहनकालीन भारतीय संस्कृती एक ऐतिहासीक दृष्टीक्षेप | डॉ. विनयकुमार श्रीवास्तव | ११८ |
| ३४ | सातवाहनकालीन बौद्ध धर्म | प्रा.डॉ.जी.व्ही.गट्टी प्रा.डॉ.मोहन मिसाळ | १२२ |
| ३५ | Articitecture during the Satvahanas | Sonawane Jagdish C. | १२५ |
| ३६ | सातवाहनकालीन सामाजिक व धार्मिक जीवन | डॉ.आर.व्ही.ढेरे | १२८ |
| ३७ | सातवाहनकालीन शिल्पकला | प्रा.डॉ.मोकाटे नाथा रामभाऊ | १३३ |
| ३८ | सातवाहनकालीन चित्रकला | डॉ.विनोद बाबुराव बोरसे | १३७ |



Scanned by CamScanner

HISTORY
ISSN - 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# हाल सातवाहनाच्या गाथासप्तशतीतील आहार व मद्यपानाचा अभ्यास

डॉ.एम.बी.वाघमारे
श्री शिव छत्रपती महाविद्यालय
जुन्नर

सातवाहन हा महाराष्ट्राचा पहिला ऐतिहासिक व भारताचे सम्राटपद संपादन करणारा महावंश होय. राजकीय दृष्टीकोनातून विचार केल्यास सातवाहनांपुर्वीचा राकीय इतिहास म्हणावा तेवढा उपलब्ध नाही. परंतू सातवाहनांच्या काळामध्ये राजकीय स्थैर्य प्राप्त होवून केवळ भारताच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही या घराण्याने महाराष्ट्राचे नाव सुवर्णाक्षरात कोरले आहे. या घराण्यातील सम्राटांनी दक्षिणापथपती, तिसमुद्दतोयपीतवाहन, अप्रतिहतचकस्वामी, अशा पदव्या धारण केल्याचे आढळते. दक्षिण भारतात सातवाहनांनी इ.स.पु. 230 ते इ.स. 230 या प्रदिर्घ काळात म्हणजेच एकूण 460 वर्षे राज्य केले आहे. एवढया प्रदिर्घ कालखंडाची दक्षिण भारताला सत्ता लाभलेल्या राजघराण्याच्या मुळस्थानांविषयी इतिहासकारांमध्ये कमालीची मतभिन्नता आहे.

इतिहासकारामध्ये त्यांच्या मूळ स्थानाविषयी दोन पक्ष आहेत. एक म्हणजे ते महाराष्ट्रीयन आहेत. तर दूसरा पक्ष म्हणतो, ते आंध्राचे आहेत. परंतु आंध्र म्हणून पुराणाशिवाय त्यांचा कुठेच उल्लेख सापडत नाही. [1] एवढेच काय त्यांच्या जन्माच्या दंतकथाही खूप आहेत. त्याची सविस्तर माहिती महाराष्ट्र गॅझेटीअर प्राचीन काळ यामध्ये सापडतात. त्याचप्रमाणे श्री. व्य. केतकरांच्या प्राचीन भारत या ग्रंथातही ही माहिती सापडते. पुरातत्वीय दृष्टीने विचार केल्यास सातवाहनांच्या उपलब्ध असलेल्या 37 शिलालेखापैकी 28 शिलालेख महाराष्ट्रात आहेत. व उरलेले 9 शिलालेख आंध्रप्रदेशात आहेत. [2] यावरुनही लक्षात येते की, त्यांची कारकीर्द ही महाराष्ट्रात होती. सातवाहन घराण्यात एकूण 30 राजे होउन गेले. इ.स. 150 नंतर त्यांची कारकीर्द आंध्रप्रदेशात असल्याने त्यांना आंध्रभृत्य किंवा आंध्रजातीय संबोधले गेले आहे. [3] परंतु एक गोष्ट मात्र समजत नाही की, मनुसंहितेत आंध्र ही जात अस्पृश्य मानलेली आहे. [4] तेव्हा 150 च्या नंतरचे राजे अस्पृश्य होते



Scanned by CamScanner

काय? कारण श्री. व्यं. केतकरांनीही सातवाहन राजे नागवंशीय होते. [5] असे म्हटलेले आहे. अशाच अर्थाचे म्हणने एच. एल. कोसारे [6] दिक्षीत बाबुराव आवळे [7] या विद्वानांनी आपल्या ग्रंथात मांडले आहे. सातवाहन यांच्या विषयीच्या दंतकथाही याला दुजोरा देतात. सातवाहनांचे मूळ स्थान कोणतेही असले तरही त्यांच्या कारकीर्दीत या देशाची आर्थिक भरभराट झाली होती, हे मात्र नक्की.

सातवाहन कालीन आहार व मद्यपान कसे होते याचे उल्लेख आपणास सापडतात. यावरुन त्याकाळी सामाजिक जीवन कसे होते हेही लक्षात येते. गाथासप्तशती हा ग्रंथ महाराष्ट्राचा आद्यग्रंथ आहे. याबद्दल इतिहासकारांत कोणतीच शंका नाही. हाल सातवाहनाचा काळ हा पहिले शतक असून तो सातवाहन घराण्यातील सतरावा राजा आहे. याच हाल सातवाहनाने संपादित केलेल्या गाथेला गाथा सप्तशती असे म्हणतात. या गाथा सप्तशतीच्या आधारे तत्कालीन समाजाचा आहार काय होता व तत्कालीन समाज मद्यपान करित होता काय याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

गाथा सप्तशतीमध्ये तांदूळ व यव याचाच उल्लेख प्रामुख्याने अन्नधान्य म्हणून आलेला आहे. तांदळाच्या कलम (कोळंबा), व्रीही (देवभात) आणि साली (साळी) या तीन जातींचा उल्लेख आढळतो. घिरीटावर भात भरडायचे किंवा उखळीत ते कुटायचे किंवा जात्यावर ते दळूण पीठ करायचे आणि नंतर त्याची भाकरी बनवायचे. भाकरी बनवण्यापूर्वी पीठ आंबवले जात असावे. यासंबंधीचा उल्लेख पुढील गाथेमध्ये आलेला आहे.

अंतो णिभुअठ्ठिअपरिअणाह ओरुध्ददारणअणाइ ।

गिम्हे घोरट्ठघग्घररवेण घोरन्ति व घराइं ।।

म्हणजे ग्रीष्मातील दुपारच्या उन्हाच्या तापामूळे लोकांनी आपआपल्या घरांची दारे लावून घेतली आहेत, वाटते की जणू सा—या घरांनी आपआपले डोळेच मिटून घेतले आहेत. घरोघर सारे लोक दूपारची झोप घेत आहेत. कोठे कोठे घिरीटांची घरघर चाललेली आहे. ती ऐकूण वाटते की, जणू सारी घरेही घोरत आहेत. [8] अशा प्रकारे भात भरडण्याचा व उखळीत कुटण्याचा उल्लेख गाथा कमांक 624 व 820 मध्येही आलेला आहे.



Scanned by CamScanner

भातापासून किंवा यवापासून कांजीदेखील बनवली जात असावी. त्याचा उल्लेख गाथा कमांक 286 मध्ये आलेला आहे. गाथा सप्तशतीमधील समाजाचा आहार साधा असावा. बहूतेक तांदळाचाच जास्त वापर होत असावा असे दिसते. तांदळाची पक्वांनेही बनवत असावेत. तांदूळ हेच समाजाचे मुख्य अन्न असावे मिठाचा उल्लेख फक्त नाशिकमधील शिलालेखात आलेला असल्याने मीठ हे मौल्यवान असावे म्हणूनच ते सरकारच्या ताब्यात होते. माशाचाही उल्लेख जास्त नाही. यावरुन हे लोक समुद्रकाठचे नसावेत असे अनुमान काढता येते. मिष्टांन्न म्हणजे तांदळाचे मोदक असत. त्यामधील सारण गुळखोब–याचे किंवा खव्याचे असे. त्याकाळी हरमराही पिकवला जात असेल. त्याचप्रमाणे करंज्ज, तीळ, मोहरी या तेलबीया तर आंम्र, जम्बू व बोर या फळांचाही उल्लेख गाथासप्तशतीमध्ये आलेला आहे. अन्नाला गोडी आणण्यासाठी किंवा पक्वान्न बनवण्यासाठी गुळाचा वापर होत असावा.

जन्तिअ ! गुलं विमग्गसि ण अ मे इच्छाइ वाहसे जन्तम्

अणरसिअ ! किंण आणसिः ण रसेण विणा गुलो होइ ?

हे चरक चालविणा–या यांत्रिका, तू माझ्या मर्जीनुसार चरक नीट चालवित नाहीस. कामावर तुझे चित्त नाही. तू पुरेसा रस काढीत नाहीस. तुला गुळ पाहिजे, पण रसाशिवाय गुळ तयार होत नाही. हे तुला कळत नाही काय ? [9] यावरुन हे लक्षात येते की, त्या काळी उसही होता व उसापासून गुळ तयार करतात याचेही ज्ञान समाजाला अवगत होतं असे दिसते. गाथासप्तशतीमध्ये मांसाहाराचाही उल्लेख आढळतो. गाथा कमांक 629 मध्ये हरणाच्या शिकारीचा उल्लेख आलेला आहे.

अण्णेसु पहिअ ! पुच्छसु वाहअपुत्तेसु पुसिअचम्माइं ।

अम्हं वाहजुआणो हरिणेसु धणुं ण णामेइ ।।

पथिका चितळ हरणाचे कातडे पाहिजे असेल तर दुस–या कोणातरी शिका–यांच्या पोराला विचार. आमचे तरुण शिकारी हरणावर धणुष्य धरित नाहीत. म्हणजेच चांगले शिकारी काळवीट मारतात. चितळ मारित नाहीत. [10]



Scanned by CamScanner

आउच्छन्ति सिरेहि विवलिएहिं च्चआ खडिएहिं णिज्जन्ता ।

णिप्पच्छिमवलिअपलोइएहिं महिसा कुड्डाइं ।।

म्हणजे कसाई रेडयांना वळून नेत आहेत. माना वळवून कुज्जांकडे अखेरचे पाहून ते रेडेसुध्दा कुज्जांचा निरोप घेत आहेत. [11] यावरुन हे लक्षात येते की, गाथासप्तशती काळात मांसाहाराला मागणी असावी.

मद्यपानही त्या काळात केले जात असावे. गाथासप्तशतीमध्ये मदिरा, मधुरस सरक, सुरा व सीधु या मद्यांचा उल्लेख आलेला आहे. गाथासप्तशतीमध्ये नायिका कदंब व मधुकांची फुले गोळा करायला जातानाचे उल्लेख आलेले आहेत. कदंबापासून कादंबरी, वारुनी व हलिप्रिया ही मद्ये तयार करित असत. मधुकांची झाडे नदिंच्या काठाकाठाने असतात. ही फुले मद्यांच्या निःसारणाचे रसायन तयार करण्यासाठी गोळा करित होते. त्याचप्रमाणे जंगलामध्ये मोहाची फुले वन्य जमाती गोळा करुन त्यापासूनही मद्य तयार केले जात असे. सुगंधी मद्य आर्थिकदृष्टया संपन्न असणा–या लोकांसाठी असावे. याचे उल्लेख गाथा सप्तशतीमध्ये आलेले आहेत.

आरुहइ जुण्णअं खुज्जअं वि जं उअह बल्लरी तउसी ।

णीलुप्पलपरिमलवासिअंस्स सरअस्स सो दोसो ।।

विळखा घालणे हा वेलीचा धर्म आहे. पहा वृक्ष वेलीचा व वेडावाकडा आहे. तरी कांकडीची वेली त्यावर चढलेली आहे. निळया कमळाचा सुगंध सर्वत्र दरवळविणा–या शरद ऋतूंचा हा दोष.

थोडक्यात जुन्या झाडांना व वेलींना शरद ऋतून नवे जीवन प्राप्त होते. त्याचप्रमाणे सुगंधीत मद्याच्या सेवनाने वृध्दांना मस्ती येते. [12] गाथा कमांक 197 मध्ये सर्वात जुन्या सुरेचा उल्लेख आलेला आहे. [13]

गाथासप्तशतीमध्ये स्त्रीयादेखील मद्यपान करित होत्या असे दिसते. अर्थात, त्यांना व्यसन होते असे नव्हे. तर आपल्या प्रियकराच्या अनुरंज्जनासाठी किंवा प्रियकराने केलेल्या आग्रहामुळे त्या मद्यपान करताना दिसतात. याबाबतीत गाथा कमांक 97, 197, 270, 544, 550, 711 व 927 यामध्ये उल्लेख आलेला आहे.

थोडक्यात सातवाहन कालीन गाथासप्तशतीमधील समाज हा अत्यंत साधा होता. सामान्य जनता, गोपालक, शाकाहारी व शेतकरी आहे. गाथेमध्ये गाईचे दूधाचे उल्लेख सापडतात. गाथा कमांक 637 मध्ये



Scanned by CamScanner

घागरभर दूध देणा–या गाईचा उल्लेख आलेला आहे. श्रीमंत लोक मात्र मिष्टांन्नाचे सेवन करित असत. एकमात्र लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे की, सामाजिक उत्सवाच्या निमित्ताने होणा–या मेजवाणीचा उल्लेख दिसत नाही.

हा शोधनिबंध गाथासप्तशतीमधील मोजक्याच गाथांचा अधार घेवून तयार करण्यात आलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ


1. संपा. स. आ. जोगळेकर, हाल सातवाहनाची गाथासप्तशती पृ. 341
2. डॉ. अनिल कठारे, प्राचीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव पृ. 322
3. डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, पैठण दर्शन, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभाग महाराष्ट्र शासन, 1985 पृ.11
4. संपा. स. आ. जोगळेकर, उपरोक्त
5. श्री. व्यं. केतकर, प्राचीन महाराष्ट्र, विभाग दुसरा, पृ. 25
6. एच. एल. कोसारे, प्राचीन भारतातील नाग, नेहा प्रकाशन नागपूर, 2008 पृ. 159
7. डी. बी. आवळे, नागवंशीय आंबेडकरी चळवळीत महारांचे योगदान, दाईनीची न्योराई प्रका. नागपूर 1999 पृ. 20–21
8. गाथा क. 794
9. गाथा क. 554
10. गाथा क. 629
11. गाथा क. 680
12. गाथा क. 534
13. संपा. स. आ. जोगळेकर, उपरोक्त पृ. 237





Scanned by CamScanner



प्रा.सोनवणे डी.जे.
सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख
एम.ए.एम.फिल.

# इतिहास विभाग

- स्थापना १९८९
- अहमदनगर जिल्हा इतिहास संमेलनाचे दि.१५ व १६ मार्च १९९७ रोजी यशस्वी आयोजन,यामधे डॉ.निनाद बेडेकर, कै.सुरेश जोशी,डॉ.अशोक नेवासकर,कै.नामदेव पवार इ.चा सहभाग
- विद्यापीठ पातळीवर २३ डिसेंबर २००८ रोजी मराठ्यांचे आरमार या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन
- विभागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष बाब म्हणून प्रकल्प(प्रोजेक्ट) घेतले जातात



प्रा.दराडे एस.एस.
सहाय्यक प्राध्यापक
एम.ए.बी.एड्.,एम.फिल.

## संपादकीय

प्राचिन भारताच्या इतिहासात सातवान घराण्याने उज्वल कामगिरी केली आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याद्वारे तत्कालिन समाजाला जागृत करून प्रगती घडवून आनणारे प्रजा हितदक्ष राजे सातवाहन घराण्यातील होते. सामान्य माणसाला राजकीय इतिहासाची व त्यातील घडामोडींची माहिती फारसी आवडत नाही परंतु प्राचिन भारताच्या इतिहासात सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक,स्थित्यंतरेकशी घडत गेली याविषयी त्याला कुतूहल असते.राजघराणे उदयास येतात व जातात परंतु समाजाचा प्रवाह अखंड वाहत असतो.तत्कालिन समाजाची जडण–घडण सातवाहन काळातील इतिहासातुन आपणांस समजते.

सातवाहन काळातील इतिहास मनाला गवसनी घालणारा कुतूहल जिज्ञासा निर्माण करणारा आहे. सातवाहनांचा इतिहास महाराष्ट्राच्या दृष्टिने महत्वाचा आहे. पैठण ही त्यांची राजधानी. सातवाहनांचा व्यापार व चलन व्यवस्था आजच्यापेक्षाही श्रेष्ठ होती असे अभ्यासकांच्या अभ्यासावरून दिसुन येते म्हणुनच या राष्ट्रीय चर्चासत्रातुन इतिहासाच्या अभ्यासकांना व विद्यार्थ्यांना सातवाहनकालीन विविध विषयांवर चर्चा करता यावी यासाठीच या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले व त्यास उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला.









Scanned by CamScanner